# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ / पौष ५, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **बंदरे, खनिकर्म मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४१**

---

### मुंबईतील अतिधोकादायक इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(१) * ५५४३२ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींचे सन २०२२ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्वेक्षणात अतिधोकादायक इमारतींमध्ये ६७४ निवासी गाळे व २६६ अनिवासी गाळे असे एकूण ९४० गाळे (भाडेकरु/रहिवासी) असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निर्णय घेवून या इमारतींचा तातडीने पुनर्विकास किंवा दुरुती करण्याबाबत तसेच रहिवाशांना इतर संक्रमण शिबीरात गाळे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने उपकरप्राप्त इमारतींच्या सन २०२२ च्या पावसाळयापूर्व केलेल्या सर्वेक्षणामध्ये एकूण २१ इमारती अतिधोकादायक घोषित केल्या असून यापैकी ८ इमारतींची दुरुस्ती प्रगतीपथावर आहे. उर्वरीत १३ इमारतींची दुरुस्ती करता येणे शक्य नसल्याने सदर इमारती रिक्त करणे, रहिवाशांना संक्रमण शिबीरात हलविणे, रिक्त इमारतींचे पाडकाम करण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि, रहिवाशांचा विरोध, न्यायप्रविष्ठ प्रकरणे इत्यादी मुळे काही प्रकरणांमध्ये विलंब होत आहे. अद्यापपर्यंत सदर इमारतींतील ७९ रहिवाशांना संक्रमण शिबीराचे वितरण मंडळामार्फत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील के.ई.एम. व नायर रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या इमारतींबाबत

**(२) * ४९७८४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर पूर्वेकडील महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या इमारतीमध्ये के.ई.एम. व नायर रुग्णालयातील निवासी डॉक्टर सन २०२० पासून रहात असताना देखील म्हाडाने ही इमारत रिकामी करण्यासाठी नोटीस पाठविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु नोटीस महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील स्थानिकांना स्थलांतरण करण्यासाठी देण्यात आल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारत निवासी डॉक्टरांना माहे मार्च, २०२३ पर्यंत वापरण्यात येईल असा निर्णय झाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,सदर निर्णयाच्या अनुषंगाने मुंबईतील रुग्णांना अविरतपणे आरोग्य सेवा देणाऱ्या निवासी डॉक्टरांच्या निवासाची व्यवस्था करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बॉम्बे डाईंग मिल वडाळा येथील संक्रमण शिबिराच्या इमारतीचा ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेने एप्रिल २०२० मध्ये कोविड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे तात्पुरत्या निवास व्यवस्थेसाठी / विलगीकरण- कक्ष म्हणून घेतला होता. सध्या या इमारतीचा वापर विलगीकरण कक्ष म्हणून न होता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध रूग्णालयातील निवासी डॉक्टारांसाठी निवासस्थान म्हणून होत आहे. कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर सदर इमारत बृहन्मुंबई महानगरपालिकेने रिक्त करून ताब्यात न दिल्यामुळे बी.डी.डी. चाळीमधील रहिवाश्यांचे स्थलांतरण करण्यात अडचणी येत आहेत. यामुळे सदर इमारतीचा ताबा म्हाडाकडे त्वरीत देण्याबाबत दि.२१.०४.२०२२, दि.१९.०९.२०२२ व दि.१९.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात आलेले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर असा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि, याबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास अवगत करण्यात आलेले नाही.

(४) के.ई.एम व नायर रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या वास्तव्याचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांदिवली मुंबई येथील राज शिवगंगा इमारतीतील सदनिका विक्रीत झालेला गैरव्यवहार

**(३) * ५०९५२ श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली येथील मेसर्स राज आर्केडस अंड एन्क्लेव्हज प्रायव्हेट लि.(आरएईपीएल) या गृहनिर्माण कंपनीने राज शिवगंगा इमारतीतील अनेक सदनिका ग्राहकांना विक्री करून त्याच सदनिका गहाण ठेवून कर्ज घेवून गैरव्यवहार केल्याने या कंपनीची विशेष पथकामार्फत (एस.आय.टी) चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत माहे मार्च, २०२२ मध्ये उच्च न्यायालयाने मुंबई पोलीस आयुक्त यांना आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २३/०३/२०२२ रोजीच्या आदेशानुसार पोलीस आयुक्त, मुंबई यांनी याबाबत दाखल असलेले ७ गुन्हे आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे वर्ग केले आहेत. यामध्ये करण्यात आलेल्या तपासानुसार ०४ आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण रूपये ८ कोटी ६९ लाख किंमतीच्या रोख रक्कम व अन्य मालमत्ता जप्त करण्यात आलेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणातील ७ गुन्ह्यापैकी ४ गुन्ह्यांतील आरोपीविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून ३ गुन्ह्यांचा तपास सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) तालुक्यात वीजग्राहकांना महावितरणकडून वाढीव वीज देयके आकारली जात असल्याबाबत

**(४) * ४९८५५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात महावितरण कंपनीकडून वीजग्राहकांना वापरलेल्या वीजेची देयके न आकारता वाढीव वीज देयके आकारली जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रथम विज देयके भरा नंतर देयके कमी करू असे वीज ग्राहकांना संबंधीत विभागाच्या अधिका-यांकडून वारंवार सांगणात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वाढीव वीज देयके न भरल्यामुळे व कोणतीही शहानिशा न करता संबंधीत विभागाकडून विज ग्राहकांची विज जोडणी बंद करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पनवेल (जि. रायगड) तालुक्यात सप्टेंबर ते नोव्हेंबर-२०२२ या कालावधीत वाढीव वीज देयकाच्या एकूण ४४०९ तक्रारी महावितरणकडे प्राप्त झाल्या त्यापैकी २६२५ वीज देयके प्रत्यक्ष रिडिंगप्रमाणे दुरुस्त करण्यात आली आहेत.
(२) व (३) हे खरे नाही.

वाढीव वीज देयकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास ग्राहकांच्या मीटर रिडिंगची व प्रत्यक्ष वीज वापराची स्थळ तपासणी करुन आवश्यकतेनुसार देयक दुरुस्ती करण्यात येते.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंधेरी (मुंबई उपनगर) येथील शालेय विद्यार्थीनीचे अपहरण करून निर्घुण हत्या केल्याबाबत**

**(५) * ५५६१८ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई उपनगर) येथील कु.वंशिता राठोड या १४ वर्षीय मुलीचे अपहरण करून तिची निर्घुण हत्या केल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी पोलीसांनी श्री.संतोष मकवाना व श्री.विशाल अनभवणे या दोन आरोपींना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा देण्याबाबत हजारो नागरिकांनी माहे नोव्हेंबर / डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कँडल मोर्चाचे आयोजन केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरण मयत मुलगी ही १८ वर्षाखालील असल्याने सदरहू प्रकरण जलद गती न्यायालयात सुरू करून दोषींना लवकरात लवकर योग्य ती शिक्षा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी मीरा भाईंदर पोलीस आयुक्तालयांतर्गत वालीव पोलीस स्टेशन येथे गु.र. क्र. ८५८/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३०२, ३७६(२) (आय) (एन), ३६४, ३६६ (अ), २०१, १२०(ब), ३४ सह पोस्को अधिनियम कलम ४, ५, ५ (एल), ६, १४, १५ प्रमाणे दि. २६ ऑगस्ट, २०२२ रोजी गुन्हा दाखल केला आहे. तसेच, सदर प्रकरणी दि. ०३ सप्टेंबर, २०२२ रोजी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

आरोपीविरूध्द दि.०२ नोव्हेंबर, २०२२ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून त्याचा कोर्ट केस क्र. स्पे. केस २९२/२०२२ असा आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील सुरू असलेल्या पुनर्वसन प्रकल्पातील रहिवाश्यांना**
**भाड्याची रक्कम अदा करण्याबाबत**

**(६) * ४९४६२ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सुरु असलेल्या पुनर्विकास प्रकल्पांत विकासक रहिवाश्यांना भाडेही देत नसून प्रकल्पांचे कामही बंद असल्याबाबतच्या अनेक तक्रारी मुंबई गृहनिर्माण मंडळाकडे प्राप्त झाल्यामुळे मुंबई गृहनिर्माण मंडळाने आढावा घेऊन अपूर्णावस्थेत असलेल्या प्रकल्पांची माहिती घेतली असता ३९ पुनर्विकास प्रकल्पाचे काम पूर्णपणे बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या विकासकांनी प्रकल्प पूर्ण करण्यास असमर्थता दर्शविली आहे असे प्रकल्प म्हाडाने ताब्यात घेवून पुर्ण करण्याची मागणी रहिवाशांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाश्यांना भाड्याची रक्कम न देणाऱ्या व प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत ठेवणाऱ्या विकासकांविरुध्द कारवाई करण्यासोबतच हे प्रकल्प कालबध्द पध्दतीने पुर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) बृहन्मुंबईमधील म्हाडाच्या पुनर्विकास प्रकल्पांपैकी ३९ पुनर्विकास प्रकल्प रखडलेले आहेत. रखडलेल्या ३९ पुनर्विकास प्रकल्पांपैकी,

१ सहकारी गृहनिर्माण संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे.

३ संस्थांच्या विनंतीनुसार सुधारित पुनर्विकास प्रस्ताव मुंबई मंडळाकडे सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

१४ संस्थांना पुनर्विकासाकरिता सुधारित प्रस्ताव मुंबई मंडळाकडे सादर करण्याबाबतचे निर्देश जारी करण्यात येत आहेत.

१३ संस्था व विकासक यांच्यामध्ये न्यायालयीन प्रकरणे सुरू आहेत.

३ संस्थांमधील पुनर्वसन सदनिकांचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत ५ गृहनिर्माण संस्थांचे प्रकल्प इतर विविध कारणांमुळे बंद आहेत.

उपरोक्त नमूद ३९ प्रकल्पांपैकी ज्या संस्था विकासकाची नियुक्ती रद्द करून म्हाडाकडे नविन विकासकामार्फत किंवा स्वयं-पुनर्विकास करण्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव सादर करतील अशा संस्थांना पुनर्विकासासाठी देकारपत्र/ना-हरकत प्रमाणपत्र प्राधान्याने जारी करण्यात येतील.

-----------------

## चंद्रपूर महाऔष्णिक विदयुत केंद्रात प्रकल्पग्रस्त प्रशिक्षणार्थी नोकर भरतीत झालेला गैरव्यवहार

**(७) * ५२१०२ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर महाऔष्णिक विदयुत केंद्रातील प्रकल्पग्रस्तांना प्रशिक्षणार्थी म्हणून शासकीय सेवेत सामावून घेताना अनेकांना बनावट कागदपत्रांच्या आधारे नोकरी दिल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरप्रकारात मानव संसाधन विभागाचे उप महाव्यवस्थापक व कार्यालयातील इतर अधिकारी / कर्मचारी आणि दलालांचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) तक्रारदार श्री. बळीराज धोटे यांनी त्यांच्या दि.१३.११.२०२१ च्या पत्रान्वये मुख्य अभियंता, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र यांच्याकडे चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रामार्फत प्रकल्पग्रस्त उमेदवारांना प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी म्हणून सामावून घेतलेल्या काही उमेदवारांच्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राविषयी आक्षेप नोंदविला होता.
(३) श्री.बळीराज धोटे यांनी दि.१३.११.२०२१ रोजी सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र यांच्या स्तरावर चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदरहू समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र यांच्या स्तरावर सर्वश्री वासुदेव लक्ष्मण कुरेकार, मुख्य लिपीक (मासं), हरीदास रावजी कुमरे, दप्तरी व संदिप रामभाऊ कन्नाके, शिपाई या कर्मचाऱ्यांवर आरोपनिश्चिती करण्यात येऊन शिस्तभंग विषयक कारवाई महानिर्मिती कंपनी स्तरावर सुरू आहे.

तसेच, श्री. अरविंद भानुदास वानखेडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं), महाऔष्णिक विद्युत केंद्र चंद्रपूर यांची कार्यालयीन आदेश क्र. ११०८५ दि. २९.११.२०२२ अन्वये औ.वि.केंद्र पारस येथे प्रशासकिय कारणास्तव बदली करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भ व मराठवाडा वैधानिक विकास मंडळाला मुदतवाढ मिळण्याबाबत**

**(८) * ५१३४२ श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागास भागाच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या विदर्भ, मराठवाडा विकास मंडळाचा कार्यकाळ दिनांक ३० एप्रिल,२०२० रोजी वा त्यासुमारास संपुष्टात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन शासनाने या मंडळांना दिनांक २९ जून, २०२२ रोजी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला होता मात्र यासंदर्भात अद्याप मा. राज्यपालांकडे शिफारस करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

मा. मंत्रिमंडळाच्या दि.२९/६/२०२२ च्या बैठकीत राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र हया तीनही विकास मंडळांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला नसून विकास मंडळे पुनर्गठित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर मंत्रिमंडळ बैठकीच्या इतिवृत्तानुसार "सदर विषय मंत्रिमंडळापुढे फेरसादर करण्याचे मंत्रिमंडळाने निदेश दिले आहेत. मा.मंत्रिमंडळाच्या निदेशानुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीन्ही विकास मंडळे पुनर्गठित करण्याचा निर्णय घेण्यासंदर्भातील प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या दि.२७/९/२०२२ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. मा.मंत्रिमंडळाने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र ही तीन्ही विकास मंडळे पुनर्गठित करण्यास मान्यता दिली तसेच मा.राज्यपाल महोदयांमार्फत विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र ही तीन्ही विकास मंडळे पुनर्गठित करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात यावी आणि विकास मंडळाना वैधानिक विकास मंडळे संबोधण्यात यावे असा निर्णय घेतला.

मंत्रिमंडळ निर्णयाच्या अनुषंगाने मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावरून दि.२८/१०/२०२२ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये विदर्भ,मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे पुनर्गठित करण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्याची मा. गृहमंत्री, भारत सरकार यांना विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ओगलेवाडी (ता. कराड, जि. सातारा) येथील शॉर्ट सर्किटने लागलेल्या आगीमुळे शेतकऱ्याचे नुकसान झाल्याबाबत**

**(९) * ५४७८० श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओगलेवाडी (ता. कराड, जि. सातारा) येथील शॉर्ट सर्किटने लागलेल्या आगीमध्ये ४३ शेतकऱ्यांचा ४० एकर ऊस जळून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, राज्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्याकरिता वीज महामंडळाकडून लोंबकळणाऱ्या विद्युत तारा, विद्युत रोहित्र यांची तपासणी व देखभालीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.
दिनांक २७/१०/२०२२ रोजी ओगलेवाडी, ता.कराड, जि.सातारा गट क्र.१६६ व इतर या ठिकाणी शॉर्ट सर्किटने लागलेल्या आगीमध्ये ४१ शेतकऱ्यांचे सुमारे ३३.१४ एकर ऊस क्षेत्र जळीत झालेले आहे.
(२) सदर ऊस जळीत प्रकरणी विद्युत निरीक्षक, सातारा यांच्या दि. २२.११.२०२२ रोजीच्या पत्राच्या अहवालानुसार महावितरण कंपनीने जळीतग्रस्त शेती मालकास किंवा त्यांच्या वारसदारास आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार महावितरण कंपनीने ४१ शेतकऱ्यांना ऊस जळीत प्रकरणी नुकसान भरपाई देण्याकरिता कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत कळविले आहे. सदर प्रकरणी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर महावितरण कंपनीच्या नियमानुसार नुकसान भरपाई देण्यात येईल.
(३) विद्युत वाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती योजनेअंतर्गत प्रतिबंधात्मक निगा व दुरुस्तीची कामे (Preventive Mainteance) महावितरण कर्मचारी व सूचिबध्द कंत्राटदारांमार्फत नियमितपणे करण्यात येतात. जळीत अपघात घडलेल्या परिसरात ओगलेवाडी, ता.कराड येथे उच्चदाब वाहिन्यांचे झुकलेले ७५ पोल सरळ केले व लघुदाब वाहिन्यांचे ८६ झुकलेले पोल सरळ केले. तसेच उच्चदाब वाहिन्यांचे ३० गाळे गार्डिंग करण्यात आले असून लघुदाब वाहिन्यांचे ५९ गाळे गार्डिंग करण्यात आले आहेत. उच्चदाब व लघुदाब वाहिन्यांच्या झोळ पडलेल्या तारा ९१ गाळे व १२८ गाळे रिस्ट्रीगींग करण्यात आले आहेत. लघुदाब वाहिनीवर एकूण ११२ गाळयामध्ये स्पेसर्स बसविले असून १३ रोहित्राची देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. सदर कामासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील सर्वच गावांत वीजेचे केबल कंडक्टर जुने झाल्याबाबत

**(१०) * ५३२८७ श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यातील सर्वच गावांत वीजेचे केबल कंडक्टर अत्यंत जुने व जीर्ण झालेले असल्याने वारंवार वीज खंडीत होऊन त्याठिकाणी जीवीत हानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत ग्राहकांनी महावितरण अधिका-यांकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने यासाठी नेमलेल्या कंपन्यांकडून दुरुस्तीची कामे होत नसल्याने ग्राहकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.
नायगांव तालुक्यात काही गावातील काही ठिकाणचे वीजेचे कंडक्टर (तारा) जुने झालेले आहेत.
(२) हे खरे आहे.
महावितरणच्या नायगांव कार्यालया अंतर्गत याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

नायगाव उपविभागातील १२२ लघुदाब वाहिन्यांचे पोल, ७७ उच्चदाब वाहिन्यांचे पोल सरळ/बदली केले आहेत. ११ झुकलेले रोहित्र सरळ करण्यात आले आहेत. २६१ रोहित्रांचे किटकॅट बदलण्यात आलेले आहेत. १४४ रोहित्रांचे अर्थिंग दुरुस्त करण्यात आले आहेत व १ कि. मी. जीर्ण वाहिनीचे तार बदलण्यात आली आहे.

(४) प्रतिबंधात्मक दुरुस्ती तसेच बिघाड दुरुस्ती योजनेअंतर्गत कामे महावितरणच्या कर्मचाऱ्यांमार्फत तसेच देखभाल व दुरुस्ती योजनेतील सूचीबध्द कंत्राटदारांमार्फत नियमितपणे करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उमराणी (जि.नंदुरबार) येथील आदिवासी बहुल गांवातील नाल्यावर पुल बांधण्याबाबत**

**(११) * ५३९६२ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी बहुल उमराणी गावांतर्गत काल्लीखेतपाडा येथील शाळेत इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतचे शिक्षण घेणारे २०५ विद्यार्थी या शाळेत आजूबाजूच्या १२ आदिवांसी पाडयांतून येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदिवासी पाडयांतील ७० विद्यार्थ्यांना शाळेत जातांना वाहता नाला (ओढा) ओलांडावा लागत असून पावसाळ्यात पुरामध्ये विद्यार्थ्यांना दोरीच्या सहाय्याने जीवघेणा प्रवास करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर नाल्यावर पूल उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

धडगांव तालुक्यातील उमराणी ते काल्लीखेतपाडा येथील माध्यमिक शाळा ते बिलंबारीपाडा हा रस्ता अवर्गीकृत असून वर्गीकृत करण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि काल्लीखेतपाडा येथील शाळेमध्ये येण्यासाठी विद्यार्थ्यांना तात्पुरत्या स्वरुपात नंदुरबार पोलीस विभागाच्या श्रमदानातून पूल बांधण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिरड शहापूर (ता.वसमत, जि.हिंगोली) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळा व वसतीगृह बांधकामासाठीचा मंजूर निधी इतर कामासाठी वर्ग केल्याबाबत**

**(१२) * ५०५३५ श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरड शहापूर (ता.वसमत, जि.हिंगोली) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळा व वसतीगृह बांधकामासाठी मंजूर असलेला ३० कोटी रुपयांचा निधी कळमनूरी तालुक्यातील इतर कामांसाठी वर्ग करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी आश्रमशाळा व वसतीगृह सन २००४ पासून भाड्याच्या जागेत असून त्याठिकाणी सध्या इतर सोई-सुविधा उपलब्ध नसतांना या शाळेसाठी आलेला निधी कळमनूरी तालुक्यातील इतर कामासाठी वर्ग केल्यामुळे गरीब आदिवासी विद्यार्थ्यांवर त्याचा विपरीत परिणाम होत असल्यामुळे सर्व आदिवासी विद्यार्थी व स्थानिक लोकप्रतिनिधींसह दिनांक ३ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास उपविभागीय कार्यालयावर मोर्चा काढून उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन आश्रमशाळांसाठी आलेला निधी आश्रमशाळेच्या कामावरच खर्च करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही,
(२) व (३) निवेदन प्राप्त झाले हे खरे आहे. मात्र, शिरड शहापूर येथील शासकीय आश्रमशाळेसाठी मंजूर असलेला निधी अन्य कोणत्याही कामासाठी देण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन नाही.

सदयस्थितीत, शिरड शहापूर (ता.वसमत, जि.हिंगोली) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळा इमारत, मुलांचे वसतीगृह इमारत, मुलींचे वसतीगृह इमारत व वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचारी निवासस्थान इमारत अशी एकूण ४ बांधकामासंदर्भातील निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. सदरील कामांच्या कार्यारंभ आदेशाची कार्यवाही प्रगती पथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यातील पोलीस निवासस्थानाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(१३) * ५५०१९ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी देण्यात आलेल्या निवासस्थानाचे केलेले बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक कार्यालय यांना लेखी तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निवासस्थानाच्या निकृष्ट बांधकामाची चौकशी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकणाची शासनाने चौकशी करून संबधीत कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) होय.

दिनांक ६/१/२०२२ रोजी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांच्या कार्यालयास तक्रार प्राप्त झाली. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांनी अधिक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ नागपूर यांना तपासणी पूर्ण करुन अहवाल सादर करण्यास सांगितले. काही ठिकाणी प्लास्टरच्या सिमेंट व वाळूच्या मिश्रणांचे प्रमाण मानकाप्रमाणे न राखल्यामुळे व पर्याप्त स्वरुपात क्युरिंग न केल्यामुळे प्लास्टर मजबूत नसल्याचे तसेच भिंतींना बारीक भेगा आढळून आल्याने सदर कमकुवत असलेले प्लास्टर काढून भेगाची मानकाप्रमाणे आवश्यक ती दुरुस्ती क्षेत्रिय अधिकाऱ्यामार्फत करण्यात आली आहे. इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतर बांधकामाच्या गुणवत्तेबाबत खात्री करण्यासाठी इमारतीचे Structural Audit केल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मैत्रय ही कंपनी बंद पडल्यामुळे गुंतवणूकदारांना रक्कमेचा परतावा मिळाला नसल्याबाबत

**(१४) * ५२१७६ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: अमरावती, नाशिक जिल्हयात गोरगरीब नागरिकांनी बचतीसाठी "मैत्रेय" या कंपनीत पैसे गुंतवले असून ही कंपनी बंद पडल्यामुळे गुंतवणूकदारांना त्यांच्या रकमेचा अद्याप परतावा मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नाशिक येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मा.गृहमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गुंतवणूकदार रकमेच्या परताव्यासाठी सातत्याने आंदोलने करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कंपनीवर कारवाई व गुंतवणूकीचा परतावा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधाचे (वित्तीय संस्थांमधील) संरक्षण अधिनियम, १९९९ मधील तरतुदीनुसार मैत्रेय ग्रुप ऑफ कंपनीज या वित्तीय संस्थेविरूध्द राज्यात एकूण ३१ गुन्हे दाखल करण्यात आले असून आरोपींच्या मालमत्ता अधिसूचित करण्यात येत आहेत.

सदर प्रकरणी फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांना रकमेचा परतावा देण्याच्या दृष्टीने, वित्तीय संस्थेच्या मालमत्ता जप्त करणे व जप्त मालमत्तावर नियंत्रण ठेवण्याकरिता सक्षम प्राधिकारी यांची नियुक्ती करण्यासंदर्भात दि.३०/११/२०१७, दि.०७/०४/२०१८, दि.०२/०६/२०१८, दि.१०/०४/२०१९ व दि.०२/०८/२०२२ एकूण पाच शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. यान्वये एकूण ३७२ मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत.

उपरोक्त पाच आदेशापैकी पहिल्या चार आदेशातील ३४६ मालमत्तांची जप्ती कायम करण्याकरिता संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी विशेष न्यायालयात दि. ०४/०९/२०१८ व दि. १०/०६/२०१९ रोजी न्यायालयीन अर्ज दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. प्रकरणी पुढील सुनावणी दि. १७/०१/२०२३ रोजी आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयात कृषि पंपाचे भारनियमन बंद करण्याबाबत

**(१५) * ५५५६४ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयात कृषि पंपाचे भारनियमन करण्यात येत असुन केवळ ८ तास विज पुरवठा करण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषि पंप भारनियमनामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान लक्षात घेवुन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कृषि पंपाचे भारनियमन बंद करुन कृषि पंपाना अखंडित विज पुरवठा करण्याची मागणी दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनातील मागणीनुसार मुख्य व्यवस्थापकिय संचालक, महावितरण यांना कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कृषि पंपाचे भारनियमन बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गडचिरोली जिल्हयासहीत संपूर्ण राज्यात कृषी पंपाना मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानूसार थ्री फेज वीज पुरवठा प्रतिदिन रात्री किंवा दिवसा ८ तास चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे.
(२) हे खरे आहे.
लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) हे खरे आहे.

(४) गडचिरोली जिल्हयासहीत विदर्भातील इतर ४ जिल्हयांमधील कृषी वाहिन्यांवरील कृषी पंपासाठी दि.०३.१२.२०२२ पासून पुढील २ महिन्यासाठी प्रतिदिन दिवसा १२ तास थ्री फेज वीज पुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नंदूरबार जिल्ह्यातील ८५ गावांचे विद्युतीकरण झाले नसल्याबाबत**

**(१६) * ५२६७२ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने १०० टक्के गावांचे विदयुतीकरण झाल्याचा दावा केला असला तरी नंदूरबार जिल्ह्यातील ८५ गावांना अद्यापही विद्युत जोडण्या मिळाल्या नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नंदूरबार जिल्ह्यातील ८५ गावे आणि शेकडो पाड्यांचे विद्युतीकरण करण्याचा प्रस्ताव वीज कंपनी व शासनाने करुनही हा आराखडा अद्याप कागदोपत्रीच राहिला आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नंदुरबार जिल्ह्यातील गावाना व पाडयांना तात्काळ विज जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
राज्यातील ४१९२८ गावांचे विद्युतीकरण पूर्ण झाले असून त्यामध्ये नंदूरबार जिल्हयातील ९४५ गावांचा समावेश आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
नंदूरबार जिल्हयातील ३३ गावे आणि ५८२ वाडीपाडयातील २१२४१ घरांचे अपांरपारिक पध्दतीने विद्युतीकरण झाले असून या घरांचे व सन २०११ नंतरच्या विस्तारीत वाडीपाडयांमधील १७३१६ घरांचे पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्याकरीता आवश्यक पायाभूत सुविधा व उपकेंद्र अंतर्भूत असणाऱ्या कामाकरिता रु.३१५.७३ कोटी इतक्या निधीची महावितरणची मागणी शासनाकडे प्राप्त झाली. सदर मागणी केंद्र शासनाकडे पाठविली असता, राज्य शासनाव्दारेच निधी उपलब्ध करण्याचे निदेश पाहता, आदिवासी विकास विभागाकडे सदर बाब विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे रावणगाव (ता. दौंड, जि.पुणे) येथील अपघातग्रस्तांना मदत मिळण्याबाबत**

**(१७) * ५४३३७ ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे रावणगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथील टोमॅटो वाहून नेणारी ट्रॉली खडकवासला कालव्यात पडल्याने त्यातील ९ महिलांपैकी ३ महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून ६ महिला यामध्ये गंभीर जखमी झाल्याची बाब दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मृत्य व जखमी कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी दौंड पोलीस ठाणे येथे गु.र.नं.५०९/२०२२ भा.दं.वि. कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली असून आरोपी जामीनावर आहे.

सदर गुन्हयातील मयत व्यक्तींना अर्थिक मदत मिळणेकामी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) येथे बनावट नंबर काढून विक्री व सेवाकरात केलेला गैरव्यवहार**

**(१८) * ४९५१५ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे बनावट नंबर काढून तब्बल १३२ कोटींचा विक्री व सेवाकरात (जीएसटी) गैरव्यवहार करण्यात आल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, श्री.हसमुख पटेल नामक व्यक्तीने ३६ बनावट कंपन्या स्थापन करुन सदर गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर व्यापाऱ्यावरील कार्यवाही केंद्रीय वस्तू व सेवाकर विभागाच्या अधिकाऱ्याकडून करण्यात आलेली आहे. हसमुख पटेल यास केंद्रीय वस्तू व सेवाकर विभागाच्या अधिकाऱ्याकडून केंद्रीय वस्तू व सेवाकर कायद्याअंतर्गत कलम ६९ नुसार अटक करण्यात आलेली असून आज रोजी सदर इसम न्यायालयीन कोठडीमध्ये आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ब्रम्हपुरी (जि.चंद्रपूर) येथील अल्पवयीन मुलीवर होत असलेल्या अत्याचाराबाबत**

**(१९) * ५०४९० श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथे एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची मुख्य सूत्रधार ही एक महिलाच असून अल्पवयीन व इतर मुलींचे अपहरण करुन देहविक्रीच्या व्यापाराचे एक रॅकेट या ठिकाणी कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने मुलीचे अपहरण व देहविक्रय करायला भाग पाडणाऱ्या संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणाची मुख्य सुत्रधार एक महिलाच असल्याचे निष्पन्न झाले आहे. परंतू सदर प्रकरणातील पिडीत अल्पवयीन मुलीप्रमाणे इतर मुलीकडून सदर महिला व तिचे साथिदार अत्याचार करून घेत होते हे आजपोवतो तपासात निष्पन्न झाले नाही.

(३) सदर प्रकरणी पोलिस स्टेशन ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर येथे अप क्र. ४६९/२०२२ कलम ३७०, ३७० (ए), ३७६, ३७६(३), ३७६(२)(एन), ३६६(अ), ३५४(अ)(१), ३४ भा.दं.वि. सहकलम ३, ४, ५, ६, ७ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६, सह कलम ४, ६, ८,१२ पोस्को कायदा २०१२ अन्वये दि. १८.०९.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये एकूण २० आरोपींचा सहभाग निष्पन्न झाले आहे. आरोपी क्र. १ ते १९ विरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दि. १४.११.२०२२ रोजी दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खडकपूर्णा व पेनटाकळी (जि.बुलढाणा) या प्रकल्पासाठी पश्चिम वाहिनी प्रकल्पातील व्यय होणारे पाणी मिळण्याबाबत

**(२०) * ५३३३७ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील खडकपूर्णा व पेनटाकळी या दोन प्रकल्पासाठी पश्चिम वाहिनी प्रकल्पातील व्यय होणारे पाणी मिळणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोदावरी खोऱ्यातील ३ टीएमसी पाणी खडकपूर्णा प्रकल्पास उपलब्ध करून दिल्यास यामधील काही पाणी खडकपुर्णा प्रकल्पाच्या टप्पा क्रमांक ४ मधील उपसाद्वारे उचलून पेनटाकळी प्रकल्पात घेता येऊ शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे खडकपूर्णां प्रकल्पावर अवलंबून असलेल्या २०० ते ३०० गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार असून या भागातील सिंचनापासून वंचित राहिलेले ८ ते १० हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पश्चिम वाहिनी प्रकल्पातील व्यय होणारे ३ टीमसी पाणी या दोन्ही प्रकल्पासाठी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २५ सप्टेंबर, २०२२ रोजी लेखी स्वरूपात मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

गोदावरी खो-यातील अतिरिक्त पाणी उपलब्धता व तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता निश्चित झाल्यानंतरच खडकपूर्णा व पेनटाकळी प्रकल्पात किती पाणी उपलब्ध होवू शकते हे निश्चित करणे शक्य आहे. खडकपूर्णा प्रकल्प हा सिंचन आवर्तनासाठी नियोजित असुन गोदावरी खोऱ्यातील काही अतिरिक्त पाणी प्रकल्पास उपलब्ध झाल्यास, खडकपूर्णा प्रकल्पाच्या टप्पा क्रमांक ४ मधील उपसाद्वारे पावसाळ्यात पेनटाकळी प्रकल्पात पाणी घेता येऊ शकते .

(३) अंशत: खरे आहे.

पश्चिम वाहिनी प्रकल्पातील व्यय होणारे पाणी खडकपूर्णा व पेनटाकळी प्रकल्पास मिळाल्यास देऊळगाव राजा व चिखली तालुक्यातील वंचित क्षेत्रास लाभ देणे शक्य आहे. तथापि, सविस्तर सर्वेक्षण केल्यानंतरच पाणी उपलब्धता, व्यवहार्यता व त्यानुसार लाभक्षेत्र निश्चित करणे शक्य आहे.

(४) होय हे खरे आहे.

(५) खडकपूर्णा प्रकल्पाचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर पाणी उपलब्धता प्रस्ताव सादर करतांना प्रकल्प ज्या खो-यात आहे त्या खो-यातील जलसंपत्ती मालकी हक्क असलेल्या महामंडळ/मुख्य अभियंता यांची पाणी उपलब्धतेबाबत व प्रस्तावित बांधकामाविषयी सहमती आवश्यक आहे. त्याअनुषंगाने याबाबतचा सविस्तर अहवाल संबंधित प्रादेशिक कार्यालयाचे पत्र दि.११/११/२०२२ अन्वये मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांची सहमती घेण्यासाठी सादर करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील ग्रामीण भागात महावितरण कंपनीने मजूरांना जास्तीची वीज देयके दिल्याबाबत

**(२१) * ५२९४० श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू तालुक्यातील (जि.पालघर) ग्रामीण भागात महावितरण कंपनीने शासनाने दिलेल्या घरकुलात, झोपडीत राहणाऱ्यांना व हातावर पोट असणाऱ्या मजूरांना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये लाखो रुपयांची वीज देयके पाठवण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामस्थांना दरमहा सरासरी ३०० ते ६०० रुपयांपर्यंत वीज देयके येत असताना अचानक लाख रुपयांपेक्षाही जादा रक्कमेचे वीज देयक जास्त बिले पाठविल्यामुळे प्रत्यक्ष विदयुत मिटरची रिडींग न घेता मनमानी पध्दतीने वीज देयके पाठविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन गोरगरीब ग्रामस्थांना लाखो रुपयांची वीज देयके पाठविणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली आहे व सदर वीज देयकात दुरुस्ती करुन नियमित सुधारीत देयके पाठविण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
माहे सप्टेंबर २०२२ मध्ये डहाणू तालुक्यातील १३ घरगुती ग्राहकांना एक लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कमेचे वीज देयक ग्राहकांच्या वीज मीटर वाचनाप्रमाणे देण्यात आले.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.
सदर १३ ग्राहकांच्या मागील काळातील मीटर वाचनातील त्रुटीमुळे वापरापेक्षा कमी युनिटचे देयक संचयीत वीज वापराच्या अनुषंगाने देण्यात आले होते. याबाबत चौकशी करुन कंपनीच्या नियमानुसार सदर वीज देयक, मीटर वाचन न झालेल्या पूर्ण कालावधीकरिता विभागून (slab benefit) व या ग्राहकांनी केलेला भरणा वजा करुन दुरुस्त करण्यात आले आहे.
तसेच उच्चस्तर लिपिक (लेखा) डहाणू उपविभाग यांच्यावर बिलिंगच्या कामात निष्काळजीपणा केल्यामुळे त्यांच्या “मासिक स्थूल वेतनातून १/३ दंड करणे” ची कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय उपकार्यकारी अभियंता डहाणू उपविभाग यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्यात आली आहे व मीटर वाचन कंत्राटदार यांच्या माहे सप्टेंबर २०२२ व ऑक्टोबर २०२२ च्या देयकात अनुक्रमे रु.३७,३५४/- व रु.३६,८५०/- दंड आकारण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विदर्भातील ६ जिल्हे आदिवासी विकास योजनांपासून वंचित असल्याबाबत**

**(२२) * ५२९५१ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित क्षेत्रामध्ये सामाविष्ट करावयाच्या गावांमधील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण किमान ५०% असणे आवश्यक असल्याचे निकष केंद्र शासनाने विहित केले आहेत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या अधिसूचनेनुसार विदर्भातील आदिवासीबहुल गोंदिया, भंडारा, नागपूर, वर्धा, अकोला व बुलढाणा जिल्हयातील अनेक तालुक्यांमध्ये आदिवासींची लोकसंख्या मोठया प्रमाणात असतांनाही त्या भागांचा अनुसूचित क्षेत्रामध्ये समावेश करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पुरंदर तालुक्यामधील चिव्हेवाडी, बहिरावाडी व घेरापुरंदर (वेताळवाडी, मिसाळवाडी, कोंडकेवाडी, रामवाडी, व घेरापानवडी), तसेच हवेली तालुक्यामधील सांबरेवाडी व घेरासिंहगड (आतकरवाडी, दुरुकदरा, खामगाव, कळकीचा मेट, कोळीवाडा, भडाळवाडी व कोळेवाडी, थोपटेवाडी) या गावातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण सन १९८१, १९९१, २००१ व २०११ च्या जनगणनेनुसार ५०% पेक्षा अधिक असूनही गावे अनुसूचित क्षेत्रामध्ये सामाविष्ट करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार आदिवासीबहुल तालुके अनुसूचित क्षेत्र म्हणून जाहिर करुन तेथे आदिवासी विकास योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे दि.२६ मे, २०१५ च्या पत्रान्वये अनुसूचित क्षेत्रात गावांचा समावेश करणेसाठी खालील चार प्रमुख निकष निश्चित केलेले आहेत :-

अ) आदिवासी लोकसंख्येचे प्राबल्य असणारी गावे.

ब) प्रस्तावित क्षेत्र सलग असावे तसेच त्या क्षेत्राचा आकार वाजवी स्वरुपाचा (Sizeable) असावा.

क) प्रस्तावित क्षेत्राचे अस्तित्व प्रशासन योग्य असावे, जिल्हा, तालुका किंवा ब्लॉक इ.

ड) प्रस्तावित क्षेत्रातील गावे लगतच्या बिगर आदिवासी क्षेत्रातील गावांपेक्षा आर्थिकदृष्ट्या मागासलेली असावी.

(२) व (३) होय.

मा.राष्ट्रपती महोदय यांच्याद्वारा महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राबाबत दि.२ डिसेंबर, १९८५ रोजी काढण्यात आलेली अधिसूचना ही सन १९७१ च्या जनगणनेवर आधारीत आहे.

(४) मा.राष्ट्रपती महोदय यांच्याद्वारा महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राबाबत दि.२ डिसेंबर, १९८५ रोजी अधिसूचना काढण्यात आलेली आहे. सदर अधिसूचना काढून ३७ वर्षाचा कालावधी झालेला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राची पुर्नरचना करणे आवश्यक आहे. अनुसूचित क्षेत्रात गावांचा समावेश करण्यासाठी केंद्र शासनाने काही निकष निश्चित केले आहेत. महाराष्ट्र राज्याच्याअनुसूचित क्षेत्राच्या पुर्नरचनेच्या अनुषंगाने दि.२३/११/२०२२ रोजी मा.मंत्री, आदिवासी विकास यांच्याकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकितील चर्चेनुसार व केंद्र शासनाच्या निकषांनुसार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुर्नरचनेचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील अनेक गावांत वीज ग्राहकांना चुकीची वीज देयके येत असल्याबाबत

**(२३) * ४९६७२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील अनेक गावांत ग्राहकांना चुकीची वीज देयके येत असल्याने नाहक आर्थिक भुर्दंडामुळे वीज ग्राहक त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मीटर रीडिंगमध्ये तफावत, एजन्सीकडून होणाऱ्या निष्काळजीपणामुळे चुकीची वीज देयके येत असून संबंधित अधिकारी यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

हवेली तालुक्यातील पर्वती व पदमावती विभागांतर्गत मागील तीन महिन्यात नॉर्मल बिलींगची टक्केवारी सुमारे ९५ ते ९६% इतकी आहे.

(२) व (३) वाढीव वीज देयकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास ग्राहकांच्या मीटर रिडींगची व प्रत्यक्ष वीज वापराची स्थळ तपासणी करुन आवश्यकतेनुसार देयक दुरुस्ती करण्यात येते. ग्राहकाला वीज देयकासंदर्भात कोणतीही तक्रार असल्यास त्या ग्राहकाला उपविभागीय कार्यालय, महावितरणचे वेबसाईट, मोबाईल ॲप इत्यादी ठिकाणी तक्रार नोंदविण्याचे पर्याय उपलब्ध आहेत व त्या तक्रारीचे त्वरीत निरसन करण्यात येते.

तसेच हवेली (जि.पुणे) तालुक्यातील रास्तापेठ शहर मंडळामध्ये माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये पर्वती व पद्मावती या विभागात प्रत्येकी एका ग्राहकाला अवास्तव वीज देयकाबाबतची बातमी दि.०७.११.२०२२ रोजीच्या वृत्तपत्र दैनिक प्रभात यामध्ये प्रसिध्द झाली होती. सदर दोन्ही ग्राहकांची वीज देयके महावितरण कंपनीच्या नियामानुसार त्वरित दुरुस्त करुन देण्यात येवून याबाबत सखोल चौकशी करुन संबंधित अभियंत्यांवर शिस्तभंगाची कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लासरा उच्चपातळी (जि.उस्मानाबाद) बराजमधील अतिरिक्त पाणी रायगव्हाण मध्यम प्रकल्पात वळविण्याबाबत

**(२४) * ५२४३८ श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) रायगव्हाण मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला तरी सदर प्रकल्प पुर्ण क्षमतेने भरत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मांजरा प्रकल्पाच्या खालील बाजूस असलेल्या लासरा उच्चपातळी बराजमधील अतिरिक्त पाणी रायगव्हाण मध्यम प्रकल्पामध्ये वळवण्याकरिता जलसंपदा विभागाने मांजरा नदीवरुन वळण योजना राबविण्यासाठी ६७.२६ कोटी रुपयांच्या खर्चास माहे जुलै, २००९ मध्ये वा त्या दरम्यान शासनाने मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना प्रलंबित असल्याने लातूर तालुक्यातील मुरुड व ५ गावे, शिराळा व ५ गावे येथील पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करता येत नसल्याने गाधवड, माटेफळ व अन्य गावे सिंचनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर योजना कार्यान्वित करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. माहे ऑक्टोंबर, २०२२ मध्ये सरासरी पेक्षा जास्त पाऊस झाला तरीही रायगव्हाण मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा एकूण क्षमतेच्या ५२% इतकाच झाला आहे.
(२) हे अशंत: खरे आहे, रायगव्हाण मध्यम प्रकल्प ता.कळंब, जिल्हा उस्मानाबाद दरवर्षी पूर्ण क्षमतेने भरत नसल्यामुळे मांजरा प्रकल्पातून पावसाळयात वाहून जाणारे पुराचे अतिरिक्त पाणी २० कि.मी. लांबीच्या फिडर कालव्याद्वारे रायगव्हाण प्रकल्पात सोडण्याची ही मंजुर योजना आहे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा निर्णय दिनांक २४/०८/२००९ अन्वये रु.६७.२६ कोटीची तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता रायगव्हाण मध्यम प्रकल्पास प्राप्त आहे. प्रस्तावीत फिडर कालव्याच्या कामाची तरतूद या सुप्रमा अंदाजपत्रकामध्ये आहे.
(३) होय, प्रकल्पावरील पाणीपुरवठा योजना व लाभक्षेत्रातील गावे सिंचनापासून वंचित आहेत हे खरे आहे. प्रकल्प पुर्ण क्षमतेने भरण्याची वारंवारीता २६ टक्के आहे. या प्रकल्पावर १७०० हे. सिंचन क्षेत्र प्रस्तावीत असुन ४ पाणीपुरवठा योजना मंजुर आहेत. १. मुरुड व ५ गावे पाणीपुरवठा योजना २. शिराळा व ५ खेडी पाणीपुरवठा योजना ३. गादवड पाणीपुरवठा योजना ४. माटेफळ पाणीपुरवठा योजना प्रकल्प पुर्ण क्षमतेने भरल्यानंतर या पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत असतात. इतर वेळेस या पाणीपुरवठा योजना प्रकल्पातील पाणीसाठ्या अभावी कार्यान्वीत करण्यात अडचणी निर्माण होतात. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील अन्य गांवे रायगव्हाण, भोसा, मसला, पिंपळगाव इत्यादी गावे सिंचनापासुन वंचित आहेत. या कारणामुळे लासरा बंधारा येथुन उपसा सिंचनाद्वारे रायगव्हाण प्रकल्पात पाणी भरणा करण्याचा प्रस्ताव आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) मांजरा धरण ते रायगव्हाण प्रकल्प या फीडर कालव्याच्या कामासाठी लागणाऱ्या जमिनी संपादीत करण्यास संबंधित शेतक-यांच्या तीव्र विरोध असल्यामुळे योजना अद्यापर्यंत सुरु होवु शकली नाही. म्हणुन मांजरा धरणाच्या खालील बाजुस मांजरा नदीवर असलेल्या लासरा बंधारा येथुन उपसा सिंचनाद्वारे रायगव्हाण प्रकल्पात पाणी भरणा करण्याचा प्रस्ताव आहे. या कामाचे सर्वेक्षण व अन्वेषण पुर्ण झालेले आहे. उपसा सिंचन योजनेची परिगणके निश्चित करण्यासाठी प्रस्ताव म.सं.स. नाशिक यांना सादर केला आहे.

-----------------

## नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात कैद्यांना भ्रमणध्वनी, गांजा आणि इतर अंमलीपदार्थ पुरविण्यात येत असल्याबाबत

**(२५) * ५१९६४ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात काही कैदी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे व संगनमताने भ्रमणध्वनी, गांजा आणि इतर अंमलीपदार्थ पुरविण्याचे रॅकेट चालवित असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे कारागृहातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या रॅकेटमधील सहभागी असलेले कैदी, संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही. तथापि, नागपूर मध्यवर्ती कारागृहातील सहा न्यायाधीन बंदी यांना दि.०५.०९.२०२२ रोजी न्यायाधीन पेशीकरीता पोलीस पथक, नागपूर शहर यांच्यामार्फत नेण्यात आले होते. सदर न्यायालयीन पेशीवरुन सदर बंदी कारागृहात परत दाखल होताना कारागृहाच्या मुख्य प्रवेशद्वारावर झडती अंमलदार यांनी नियमानुसार बंद्यांची झडती घेतली असता त्यातील एका बंद्याजवळ असलेल्या कागदपत्रांच्या फाईल मध्ये संशयास्पद वस्तू व भ्रमणध्वनीच्या बॅटरीज् आढळून आल्या.

त्यानुषंगाने पोलीस ठाणे, धंतोली, नागपूर शहर येथे न्यायाधीन बंदी क्र.३१९/२०२२ याच्याविरुध्द एन.डी.पी.एस.ॲक्ट, १९८५ चे कलम ८(C), २०(B)IIA,२९ अन्वये गु.र.क्र.२४३/२०२२ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पोलीस ठाणे, धंतोली, नागपूर शहर यांच्याकडून तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस ठाण्यात मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

**(२६)** * **५४२५२ श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १३ पोलीस आयुक्तालय आणि ३६ जिल्हा पोलीस घटक कार्यालयालयात लाखो पोलीस अधिकारी / कर्मचारी कार्यरत असून त्यातील किमान ३०००० महिला अधिकारी / कर्मचाऱ्यांना पोलीस ठाण्यातच मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध नसल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन पोलीस महासंचालक यांनी राज्यातील पोलीस ठाण्यात महिला स्वच्छतागृह / विश्रांतीगृह याबाबतचा अहवाल मागवला होता, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त अहवालानुसार राज्यातील ४८ घटकांमध्ये एकूण १०१० पोलीस ठाण्यापैकी ८३७ पोलीस ठाण्यात महिला पोलिसांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे व ५७१ पोलीस ठाण्यात महिला विश्रांतीगृह असल्याची माहिती देण्यात आली असून प्रत्यक्षात मात्र राज्यातील निम्म्यापेक्षा जास्त पोलीस ठाण्यात महिला स्वच्छतागृह आणि महिला विश्रांतीगृह नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला स्वच्छतागृहे आणि विश्रांती गृहे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय वगळता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या आस्थापनेवर एकूण १०२१ पोलीस ठाणी आहेत. उक्त १०२१ पोलीस ठाण्यांपैकी,-

(१) ९८४ पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे उपलब्ध आहेत.

(२) उर्वरित ३७ पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी प्रसाधनगृहे / विश्रांती कक्ष बांधण्याचे प्रस्तावित आहे.

(३) ५९० पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र विश्रांती कक्ष उपलब्ध आहेत.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या आस्थापनेवर एकूण ९३ पोलीस ठाणी असून सर्व ९३ पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे आणि विश्रांती कक्ष उपलब्ध आहेत.

ज्या पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र विश्रांती कक्ष उपलब्ध नाहीत त्यांपैकी काही ठिकाणी महिला पोलीस कर्मचारी पोलीस ठाण्यातील सामाईक विश्रांती कक्षाचा वापर करतात. तसेच, काही ठिकाणी पोलीस ठाण्याजवळच्या पोलीस वसाहतीमधील रिक्त सदनिकांचा आणि बिनतारी कक्षाचा महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी विश्रांती कक्षाचा म्हणून वापर करण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांच्याकडून बांधण्यात येणाऱ्या पोलीस ठाण्यांच्या नवीन प्रशासकीय इमारतींमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे / विश्रांती कक्ष यांचा समावेश आहे.

पोलीस दलाच्या प्रशासकीय इमारती व सेवा निवासस्थाने यांच्या दुरुस्तीकरिता दरवर्षी आवश्यकतेप्रमाणे अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मर्यादेत निधी उपलब्ध करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निमगाव खंडोबा (ता.खेड, जि.पुणे) येथील चासकमान धरणाचा डावा कालवा फुटल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(२७) * ४९७१८ श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमगाव खंडोबा (ता.खेड, जि.पुणे) या गावाच्या हद्दीत चासकमान डावा कालवा माहे ऑगस्ट / सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान फुटल्याने शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जाऊन शेत पिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उक्त प्रकरणी झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कालवा दुरुस्ती व तो पुन्हा फुटू नये यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) निमगाव खंडोबा (ता.खेड, जि.पुणे) येथील चासकमान डावा कालवा ३७/९७० कि.मी. येथे दि.२१/०८/२०२२ रोजी दु.०१:३० वा. फुटल्याने कालव्यालगतच्या शेतकऱ्यांच्या शेतात अत्यल्प प्रमाणात पाणी गेले. त्याची कृषी विभाग व महसूल विभाग यांच्याकडून संयुक्त पाहणी करुन पंचनामे केले आहेत. सदर पंचनामे व नुकसान भरपाई रक्कमेस सक्षम स्तरावर मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहे. सदर मंजूरी प्राप्त होताच नुकसान भरपाई रक्कम संबंधीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) चासकमान डावा कालवा फुटीच्या दुरूस्तीचे काम दि.३०/०९/२०२२ रोजी पूर्ण झाले असून, सद्य:स्थितीत कालवा सुस्थितीत आहे.

चासकमान डावा कालवा डोंगर उतारावर असल्याने डोंगराच्या बाजूला खोदाई व दुसऱ्या बाजूला भरावा आहे. सदर कालव्याचे काम ३० ते ३५ वर्षापूर्वी रोजगार हमी योजनेंतर्गत झाले असल्यामुळे भराव करताना योग्य पध्दतीने गाभा भराव व दबाई झाली नाही. त्यामुळे कालव्याच्या भरावामधून गळती होते. तथापि आवश्यक तेथे पाखरण कार्यक्रमांतर्गत यांत्रिकी विभागामार्फत तातडीची दुरुस्ती करण्यात येते.

चासकमान प्रकल्प अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे अंतर्गत बांधकामाधीन असल्याने सद्य:स्थितीत चासकमान डावा कालवा १ ते १४४ कि.मी. मधील कालव्यामधील मोठ्या प्रमाणात गळती होत असलेल्या बांधकामाची दुरुस्ती, भरावामधील गळती दुरुस्ती व आवश्यकतेनुसार निवडक ठिकाणी अस्तरीकरण व इतर तदनुषंगीक कामे त्यांच्यामार्फत बिगरसिंचन प्रापणसूची अंतर्गत पूर्ण केली आहेत. तसेच चासकमान डावा कालवा ० ते १४४ कि.मी. मधील अस्तरीकरण करण्यासाठीची तरतूद तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावात असून, सदर प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## आदिवासी प्रकल्प पांढरकवडा (जि.यवतमाळ) कार्यालयामार्फत अतिरिक्त साहित्याची खरेदी केली असल्याबाबत

**(२८) * ५४२८० श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि. यवतमाळ) येथील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत विशेष केंद्रीय सहाय्य योजनेअंतर्गत लहान व मोठी वॉटर कुलंट (आर.ओ.), डिजीटल प्लेक्स बोर्ड तसेच संगणक ई-साहित्याची माहे मे ते जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान खरेदी केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभागाने काढलेल्या दिनांक ४ मे २०२० रोजी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार कोवीड १९ संसर्गाच्या प्रादुर्भाव व लॉकडाउन असल्याने राज्याच्या महसुलात घट झाल्याने सर्वच विभागांना निधी खर्च करण्यावर निर्बंध घालण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा यांनी सर्वच शासकीय आदिवासी आश्रमशाळा व वसतीगृह बंद असतांना तसेच शासनाने निधी खर्च करण्यावर निर्बंध घातले असतानाही प्रत्येक वसतीगृहांकरिता कोटयवधी रुपयांचे साहित्य खरेदी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळले त्याअनुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांनी वॉटर प्युरिफायर, डिजिटल प्लेक्स बोर्ड व संगणक खरेदी करिता दि.१८/३/२०२० दि.२९/४/२०२० रोजी Gem पोर्टलवर निविदा प्रसिद्ध करुन खरेदी प्रक्रिया राबविली आहे.

प्रस्तुत खरेदी प्रक्रिया वित्त विभागाचा दि. ४/५/२०२० रोजीचा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वीच सुरु करण्यात आली होती. तसेच प्रस्तुत खरेदी केंद्रीय योजनांतर्गत प्राप्त निधीमधून करण्यात आली असून वित्त विभागाचा सदर शासन निर्णयामधील निर्बंध केवळ राज्य योजना व राज्य हिस्सा असलेल्या केंद्र सहाय्यित योजनांनाच लागू आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबीतील कळंबोली येथील फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या गोदामातून तांदूळ इतरत्र वितरित केल्याबाबत

**(२९) * ४९८८६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील कळंबोली येथील फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या (एफसीआय) गोदामातून मुंब्रा येथील १५ रेशनिंग दुकानांसाठी आलेला ७ लाख २५ हजार ४७० रुपये किमतीचा २० लाख टन तांदुळ भिवंडीत नेताना गुन्हे शाखेच्या भिवंडी युनिटच्या पोलीसांनी भिवंडीतील रांजनोली नाका येथे ताब्यात घेतल्याची घटना दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, शासनाच्या तांदळाचा काळाबाजार करण्याऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि.२७ सप्टेंबर, २०२२ रोजी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातंर्गत गुन्हे शाखेमार्फत भिवंडी परिसरात पेट्रोलिंग करत असताना शासकीय तांदूळाची वाहतूक करणाऱ्या दोन टेम्पोमध्येअवैधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने नेताना रू. ७,२५,४७०/- इतक्या किंमतीचा शासकीय तांदूळ आढळून आला.

(२) व (३) सदर प्रकरणी शिधावाटप अधिकारी यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोनगाव पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गु.र.क्र.२३३/२०२२ जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ चे कलम ३, ७, १० सह महाराष्ट्र फूड ग्रेनस रेशनिंग (सेकंड) रेग्युलेशन १९६६ चे कलम १८ (अ) आणि कलम २३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनेक शाळकरी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये ई-सिगारेटचे व्यसन वाढत असल्याबाबत**

**(३०) * ५०५३७ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांमध्ये ई-सिगारेटचे व्यसन वाढत असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा व महाविद्यालयीन मुलांना व्यसन लागू नये म्हणून शिक्षण संस्थेच्या शंभर मीटर परिसरात सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास राज्य शासनाने २००५ पासून बंदी घातली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असतानाही राज्यात शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर परिसरात पेनड्राइव्ह, पेन, लायटरच्या आकारात असलेली ई-सिगारेटची, तसेच सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थ पान टपरी, स्नॅक्स सेंटर, जनरल स्टोअर्समध्ये सरार्सपणे जास्त दरात विक्री होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि ई-सिगारेट बाबत माहे सप्टेबर २०२२ दरम्यान राज्यात १७ गुन्हे दाखल असून यामध्ये १४ आरोपींना अटक करुन रुपये १०,८८,३०५/- इतक्या रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(२) होय.

सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थ (जाहिरातीस प्रतिबंध आणि वाणिज्य, व्यापार निर्मीती, पुरवठा, वितरण) अधिनियम, २००३ अंतर्गत शिक्षण संस्थेच्या १०० मीटर परिसरात सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर बंदी घालण्यात आली आहे.

(३) व (४) अशा प्रकरणी पोलीस विभागास प्राप्त गुप्त बातमी व तक्रारीच्या अनुषंगाने भारतीय दंड विधान १८६०, अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६, सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थ (जाहिरातीस प्रतिबंध आणि वाणिज्य, व्यापार निर्मिती, पुरवठा, वितरण) अधिनियम, २००३ व ई-सिगारेट प्रतिबंध (उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री, वितरण, साठवणूक आणि जाहिरात) कायदा, २०१९ या कायद्यातील तरतुदीनुसार वेळोवेळी कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दारव्हा, दिग्रस व पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील मृद संधारणाच्या आस्थापनेवर असलेल्या कृषि विभागातील कर्मचाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार**

**(३१) * ५२३३१ श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील दारव्हा, दिग्रस, पुसद येथील जलसंधारण विभागाअंतर्गत येणाऱ्या मृद संधारणाच्या आस्थापनेवर असलेल्या कृषि विभागातील कर्मचाऱ्यांनी कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणातील मुख्य आरोपींना पोलिसांनी अटक न करताच प्रकरणाचा तपास सुरु केल्यामुळे या प्रकरणी दोषींना पाठीशी घालण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदरची बाब माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये निदर्शनास आली असून प्रस्तुत प्रकरणी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे दिनांक २७.०८.२०२१ रोजी  गु.र.नं.६८९/२०२१, कलम ४२०, ४०६, ४०८, ४०९,३४, भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद आहे.
(२) हे खरे नाही, सदर गुन्ह्यातील आरोपींनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथून अटकपूर्व जामीन मिळविलेला आहे.
(३) सदर प्रकरणी कृषी आयुक्तालय, पुणे यांचेकडून लेखापरीक्षण करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले असून प्रकरण तपासाधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शाहादा(जि.नंदूरबार) येथून मजूर वाहून नेणाऱ्या मालवाहू ट्रक व बसचा झालेला अपघात**

**(३२) * ५००२१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहादा (जि.नंदूरबार)येथून मजूर वाहून नेणा-या मालवाहू ट्रक व बस यांच्यात दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अपघातात ७ मजूरांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने मृत पावलेल्या मजूरांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि.२९.९.२०२२ रोजी झालेल्या सदर अपघातात एकूण ०६ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

(२) उपरोक्त घटनेच्या अनुषंगाने वाहन चालकाविरुध्द शहादा पोलीस ठाणे गु.र.नं.६१४/२०२२ भा.द.वि.कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, ४२७ सह मोटार वाहन कायदा क.१८४, ६६/१९२, १३४ प्रमाणे दि.३०.०९.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत व्यक्तींच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नंदूरबार यांचेमार्फत मा.मुख्यमंत्री सहायता निधी कक्षास सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ब्राम्हणवाडा (ता.अकोला , जि.अहमदनगर) येथील शासकीय आदिवासी वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या भोजनाबाबत

**(३३) * ५३३८० श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्राम्हणवाडा (ता.अकोला, जि.अहमदनगर) येथील शासकीय आदिवासी वसतीगृहात ५५ विद्यार्थ्यांवर दिवसभर उपाशी राहण्याची वेळ आल्याचे माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतीगृहात विद्यार्थ्यांना कंत्राटदारामार्फत जेवण दिले जात नसून काही वेळा दिलेले जेवण पुरेसे देखील नसणे, तसेच स्वयंपाकासाठी निकृष्ट दर्जाचे धान्य व भाजीपाला वापरल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामस्थांनी तक्रारी केल्या असता कंत्राटदारामार्फत त्यांना धमकाविण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कंत्राटदाराविरुध्द कारवाई करुन विद्यार्थ्यांना सकस आहार व योग्य त्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये दिनांक १२.०७.२०२२ पासून शगुन गृहउद्योग, औरंगाबाद यांचे मार्फत भोजन पुरवठा केला जात होता. दिनांक १२.०९.२०२२ रोजी भोजन ठेकेदाराकडून विद्यार्थ्यांना सकाळचा नास्ता व दुपारचे भोजन देण्यात आले नाही. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर यांच्या दिनांक १४.०९.२०२२ रोजीच्या आदेशान्वये सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) व कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांनी सदर वसतीगृहास भेट देऊन वस्तुस्थितीची पाहणी केली.

(३) हे खरे नाही.

(४) सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) व कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांनी दिनांक १४.०९.२०२२ रोजी वसतीगृहास भेट देऊन चौकशी अहवाल प्रकल्प अधिकारी, राजूर यांना सादर केला. त्यानुसार शगुन गृहउद्योग, औरंगाबाद यांचा भोजन ठेका रद्द करण्यात आला आहे. दिनांक १५.०९.२०२२ पासून अन्य भोजन ठेकेदारा मार्पत भोजन ठेका चालविण्यात येत आहे. भोजन पुरवठा सुरळीत असून विद्यार्थ्यांच्या भोजनाबाबत तक्रारी नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगोला-मिरज (जि.सोलापूर) रस्त्यावर कार्तिकी यात्रेसाठी जाणाऱ्या सात वारकऱ्यांचा झालेला मृत्यू

**(३४) * ५१६३३ श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कार्तिकी यात्रेसाठी पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीत सांगोला मिरज रस्त्यावर भरधाव वाहन घूसून सात वारकऱ्यांचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अपघाताची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार मृत वारकऱ्यांच्या कुटुंबियांना तसेच अपघातात जखमी झालेल्यांना शासनाने किती आर्थिक मदत केली,
(३) असल्यास, सदर महामार्गांवर वारंवार होणारे अपघात टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

जठारवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथील वारकरी पंढरपूरकडे पायी जात असताना दि.३१/१०/२०२२ रोजी सांगोला, जि.सोलापूर हद्दीत भरधाव कार वारीमध्ये घुसल्याने ७ वारकरी जागीच मृत्य पावले असून एका वारकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.
(२) उपरोक्त प्रकरणी सांगोला पोलीस ठाणे येथे वाहन चालकांविरुध्द गु.र.नं.१२२३/२०२२ भा.द.वि.कलम ३०४, ३३७, ३३८, २७९, १७७ सह मोटार वाहन अधिनियम कलम १८४, ३(१)/१८१, ५/१८१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर अपघातातील एका आरोपीस अटक करण्यात आली असून दुसऱ्या आरोपीस सी.आर.पी.सी. ४१ प्रमाणे नोटीस देण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

सदर अपघातातील ७ मृत व्यक्तींच्या वारसास मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी रु.५ लक्ष इतकी आर्थिक मदत देण्यात आली असून उपचारादरम्यान मृत पावलेल्या वारकऱ्याच्या वारसास आर्थिक मदत देण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षास दि.०८/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे.
(३) सदर महामार्गांवर वारंवार होणारे अपघात टाळण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

- सदर महामार्गावर उप केंद्र सांगोला निर्माण करण्यात आले असून तेथे २ पोलीस अधिकारी व १२ पोलीस अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली आहे.
- वाहनांच्या गतीवर नियंत्रण ठेवण्याकरीता विशेष मोहिम राबवून महामार्ग पोलीस, जिल्हा वाहतूक शाखा, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांचेकडील इंटरसेप्टर वाहनांद्वारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येते.
- सदर मार्गावरील वाहन चालक, पादचारी यांना प्रबोधन करून वाहतूक नियमांबाबत अवगत करण्यात येते.
- महामार्गालगतच्या गावांमधील तरूणांना मृत्यूंजय दूत म्हणून नेमण्यात आले असून त्यांना वाहतूक नियमन व प्रथमोपचाराचे प्रशिक्षण देऊन त्यांचे मार्फत महामार्गालगतच्या गावांमध्ये वाहतूक नियम जनजागृती विषयक काम केले जाते.
- तसेच वेळोवेळी वैद्यकिय पथकाच्या मदतीने वाहनचालकांचे नेत्र व आरोग्य तपासणी शिबीरे घेण्यात येऊन त्यांची आरोग्य तपासणी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात निमकोटेड युरिया खताचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(३५) * ५१०८० श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना अनुदान किंमतीत देण्यात येणाऱ्या १७ लाख रूपये किंमतीच्या शासकीय खतांचा काळाबाजार करुन व्यावसायिक उपयोगासाठी नेण्यात येत असलेला माल नारपोली पोलीस, भिवंडी यांनी जप्त केल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याअनुषंगाने मे.योग फार्मा व गोडावून मालकांवर नारपोली पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदवूनही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत नारपोली पोलीस स्टेशनच्या हद्दीत आरोपींनी निमकोटेड युरियाची साठवणूक व विक्री करून शासनाची व शेतकऱ्यांची फसवणूक केल्याने योग इन्टरप्रायजेस व गोडाऊन चालविणाऱ्यांविरूद्ध नारपोली पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. ५७७/२०२२ नुसार भा. दं. वि. कलम ४२०, ३४ खत नियंत्रण आदेश, १९८५ मधील खंड १९, २५ (१), (२), (३), ३५ सह अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ कलम ३, ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी एका आरोपीला मा.उच्च न्यायालयाने तात्पुरता जामीन मंजूर केला असून इतर ५ आरोपींना सीआरपीसी कलम ४१(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे. सदर प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पांढरी मध्यम प्रकल्प( ता.वरुड, जि. अमरावती) पूर्ण न करताही कंत्राटराला देयके अदा केल्याबाबत

**(३६) * ५२७२५ श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरी मध्यम प्रकल्पाचे (ता.वरुड, जि.अमरावती) काम कंत्राटदाराकडून अपूर्णावस्थेत असतांनाही संबंधित कंत्राटदारास कामाचे देयक अदा करण्यात आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. पंढरी प्रकल्पांतर्गत कंत्राटदाराने माती धरण, वर्धा नदीवरील बॅरेज, इंटेक स्ट्रक्चर, पुरवठा कालवा व त्यावरील बोगद्याचे खोदकाम १००% पुर्ण केले असुन पुरवठया कालव्यावरील ओपन ट्रफ व कट ॲड कव्हरचे ७०% काम व जलोत्सारणीचे क्रेस्ट लेव्हल पर्यंतचे काम जुन २०२१ पर्यंत पुर्ण केले. त्यानंतर ऑक्टोंबर २०२२ पर्यंत उपरोक्त घटका अंतर्गत उर्वरीत कामे बंद होती. काम सुरु करण्याकरीता कंत्राटदारास वेळोवेळी पत्रान्वये / नोटीस व्दारे कळविण्यात आले आहे. चालु हंगामात काम करण्याबाबत कंत्राटदाराव्दारे पुर्वतयारी करण्यात येत असुन अद्याप पर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. जुन २०२३ पर्यंत प्रकल्पाच्या धरणाचे १००% काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे नाही. सद्य:स्थितीत कंत्राटदाराने केलेल्या कामाचे चालु देयकाव्दारे भुगतान करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, सदर प्रकल्पांतर्गत धरण कामामध्ये देयके प्रदान करतांना अनियमितता झाल्याबाबत २०१७ मध्ये निदर्शनास आले. त्यानुसार सदर अनियमितते बाबत शासन स्तरावर चौकशी करण्यात आली. सदर चौकशीन्वये संबंधीत जबाबदार अधिकाऱ्यास 'ठपका' ठेवण्याची शिक्षा देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरामध्ये म्हाडा अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या पुनर्विकासित**
**इमारतीतील गाळे वितरणात झालेली अनियमितता**

**(३७) * ५३८०५ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरामध्ये म्हाडा अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या उपकरप्राप्त पुनर्विकसित इमारत फ/पी.क्रं.८२४ माहिम विभाग, इमारत क्रं.१४६/ए एस के बोले रोड, बागल हाऊस, दादर (प) येथील गाळा क्रं. १/अ चे रहिवासी यांनी म्हाडाला बनावट कागदपत्रे सादर करुन म्हाडाच्या अधिकारी वर्गाच्या संगनमताने कायमस्वरुपी गाळयाचे वितरण केले असल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, प्राधिकरण यांनी दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, सदर सुनावणीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, प्राधिकरण यांनी मुळ गाळेधारक शेख अब्दुल गफार जान मोहम्मद यांनी सादर केलेल्या निष्कासन सूचना व आधारकार्डची खातरजमा कार्यकारी अभियंता (सी-१)/दुवपु व उपमुख्य अधिकारी (पुगा)/दुवपु यांनी करुन दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजीपर्यंत अहवाल सादर करावा असे आदेश देण्यात आले असून देखील कार्यकारी अभियंता (सी-१)/दुवपु व उपमुख्य अधिकारी (पुगा)/दुवपु यांनी अद्यापपर्यंत सदर अहवाल सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, मुळ गाळेधारक यांनी बनावट कागदपत्रे सादर करुन गाळा हडप केल्याचे निष्पन्न झाले तर त्यांच्याविरुध्द भा.द.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, १९९, ४०३, ४२३, ४४३, व ३४ नुसार संबंधित पोलिस ठाण्यात प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात यावा असे आदेश मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, प्राधिकरण यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय ,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्या अनुषंगाने चौकशीअंती सदर इमारतीमधील मुळ गाळेधारक व म्हाडातील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच म्हाडाने बांधलेल्या सर्व उपकर प्राप्त इमारतीचे संरचनात्मक परिक्षण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा स्वरुपाची तक्रार दि.३०.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे यांनी दिलेल्या निर्देशानुसार संबंधित गाळेधारकाने सादर केलेली कागदपत्रे व आधार कार्ड इ. तपासण्यासाठी मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्याकडे गाळे धारक व सर्व संबंधित अधिकारी यांची दि.२९.१२.२०२२ रोजी सुनावणी आयोजित केलेली आहे.
(४) हे खरे आहे.

(५) मुळ गाळेधारक श्री.शेख अब्दुल गफार जान मोहम्मद या नावाने मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळामध्ये उपस्थित राहिलेल्या व्यक्ती विरूध्द प्रथम खबरी अहवाल (F.I.R.) दाखल करण्याबाबतचे पत्र खेरवाडी पोलिस चौकी, वांद्रे यांना दिलेले आहेत.

पुनर्रचित उपकरप्राप्त इमारतींचे संरचनात्मक परिक्षण ३० वर्षानंतर करण्यात येते. त्यानंतर दर १० वर्षाच्या कालावधीनंतर पुन:श्च संरचनात्मक परिक्षण करण्याची तरतूद आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुलगाव (जि. वर्धा) शहरात एका बालिकेचे अपहरण करुन अत्याचार केल्याबाबत

**(३८) * ५५१०१ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुलगांव, (जि.वर्धा) शहरात शाळेत जात असलेल्या एका बालिकेचे दोघा नराधमांनी चाकूचा धाक दाखवून अपहरण करुन तिच्यावर वाहनामध्ये लैंगिक अत्याचार केल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर गुन्हा जलदगती न्यायालयात चालवून दोषींना शिक्षा होण्यासाठी तसेच पिडीतेला आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, सदर प्रकरणी पोलीस स्टेशन पुलगांव, जि. वर्धा येथे अप क्र ७५७/२०२२ कलम ३६३, ३७६(३), ५०६ भा द वि, सहकलम ४, ६, २१(१) बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये दि. २२.०८.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील एकूण ०२ आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दि.१८.१०.२०२२ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. पिडीत मुलीला मनोधैर्य योजनेअंतर्गत शासनाकडून मदत मिळण्यासाठी विधी सेवा प्राधिकरण यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे कळंबस्ते (ता. चिपळूण,जि.रत्नागिरी) येथे गोवा बनावटीची दारू सापडल्याबाबत

**(३९) * ५२१३२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कळंबस्ते (ता. चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे एका कंटेनरमध्ये सुमारे ३५ लाख रूपये किंमतीची गोवा बनावटीची दारू सापडली असून त्यानंतर लगेच दोन दिवसांनी याच गावातील एका घरामध्ये गोवा बनावटीच्या दारूचा मोठा साठा दिनांक ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी वा त्यासुमारास पोलिसांनी पकडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारवाईनंतर चिपळूण शहर आणि परिसरात गोवा बनावटीची दारू साठा करून ठेवलेली अनेक गोदामे असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०१/०१/२०२२ रोजी आरोपी हा आपले मालकीच्या मालवाहू वाहनात गोवा बनावटीची विदेशी दारु गैरकायदेशीर बिगर परवाना वाहतूक करीत असताना, मुंबई गोवा महामार्गावर कळंबस्ते फाटा येथे मिळून आल्याने चिपळुण पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३५७/२०२२ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली असून तपास सुरु आहे.

तसेच चिपळुण पोलीस ठाणेच्या पथकामार्फत दिनांक ०२.११.२०२२ रोजी कळंबस्ते बौध्दवाडी, ता.चिपळुण येथील एका घरावर छापा टाकला असता, गोवा बनावटीची गैरकायदेशीर बिना परवाना दारु मिळुन आल्याने अन्य आरोपीविरुध्द चिपळुण पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३५९/२०२२ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिकटवेली (जि.गडचिरोली) येथील आदिवासी गर्भवती महिलेचा दळणवळणाच्या सुविधे अभावी मृत्यु झाल्याबाबत

**(४०) * ५०५४४ श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकटवेली (जि.गडचिरोली) येथील झुरी तलांडी (वय २६ वर्षे) नामक ८ महिन्यांच्या आदिवासी गर्भवती महिलेचा रस्ता खराब असल्यामुळे दवाखान्यात दाखल करण्यापुर्वीच मृत्यु झाल्याचे दिनांक ६ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर महिलेस प्रसुतीकरीता चिकटवेली पासून ३५ कि.मी. लांब असलेल्या कमलापूर (ता.अहेरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ट्रॅक्टरने नेले जात असताना ट्रॅक्टरचे चाक खड्डयात अडकल्यामुळे रस्त्यामधेच महिलेचा मृत्यु झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या भागातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबरोबरच मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) श्रीमती झुरी तलांडी रा.चिटवेली ता.अहेरी जि.गडचिरोली या गर्भवती मातेच्या पोटात दि.०६/०९/२०२२ रोजी सायंकाळी दुखायला लागले होते. त्यामुळे सदर महिलेस उपचारासाठी ट्रॅक्टरव्दारे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राकडे बैलगाडीच्या रस्त्याने नेताना वाटेतच मृत्यू झाला, ही वस्तुस्थिती आहे.

(३) उक्त घटनेशी संबंधित मोदूमोडगू-नैनगुंडम- तोंडेर-चितवेली ग्रा.मा. १२१ हा रस्ता सद्यस्थितीत बैलगाडीचा रस्ता आहे. अशा प्रकारच्या अद्याप बारमाही रस्त्याने न जोडलेल्या राज्यातील आदिवासी वाड्या/पाडे यांना मुख्य रस्त्याशी जोडण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

यापुर्वी राज्यस्तरावरुन अहेरी तालुक्यातील रस्त्यांसाठी सन २०२१-२२ मध्ये रु.४.७५ कोटी रक्कमेची ४४ कामे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत भंगारामपेठा, चिटवेली व तोंडेर ग्रामपंचायतीमध्ये सिमेंट रस्त्याची कामे करण्यात आली आहेत.

त्याचप्रमाणे मुलभूत सोयी-सुविधा पुरविणाऱ्या उदा. आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, वीजपुरवठा वगैरे विभागांना पुरक निधी (Gap Funding) म्हणून मागणीनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. तसेच, आदिवासी उपयोजना क्षेत्रात वैयक्तिक व सामुहिक सोयी-सुविधांच्या योजना देखील राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील जायकवाडी डावा कालव्याचे पाट शेवटपर्यंत जात नसल्याने शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळत नसल्याबाबत**

**(४१) * ५४६८१ श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्यावर परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील पाथरी उपविभागात जवळपास ३६ हजार हेक्टर मूळ सिंचनापैकी केवळ १० ते १२ हजार हेक्टर क्षेत्राचे सिंचन होत असल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, जायकवाडी धरणाची निर्मिती झाल्यानंतर पाथरी तालुक्यातील उपविभागात जवळपास ३६००० हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याचे शासनाचे धोरण असतांनाही ते अद्यापर्यंत पुर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जायकवाडी डावा कालव्याचे पाट शेवटपर्यंत जात नसल्याने शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळत नसल्याने हजारो शेतकरी हक्काच्या सिंचनापासून वंचित राहत आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलसंपदा विभागाने पाथरी उपविभागातील ३६ हजार हेक्टर मूळ सिंचन क्षेत्रात अद्यापही पुरेसे कॅनल न काढल्याने तसेच सध्या अस्तित्वात असलेले कॅनल हे नादुरुस्त झाल्याने १२००० हेक्टर क्षेत्राला पुरेसे सिंचन मिळत नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

पाथरी उपविभागांतर्गत जायकवाडी डाव्या कालव्यावरील लाभक्षेत्र (ICA) ३५७७९ हे. एवढे आहे. सन २०२०-२०२१ मध्ये पाथरी उपविभागाच्या कार्यक्षेत्रात रब्बी हंगामात ९२२४ हे. व उन्हाळी हंगामात ६३६३ हे. सिंचन झाले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

तथापि लाभधारकांची सिंचनासाठीची पाण्याची अडचण लक्षात घेऊन विभागाकडील उपलब्ध यांत्रिकी संयंत्राच्या सहाय्याने कालव्यातील गाळ काढणे, झाडेझुडपे काढणे, इ. जास्तीत जास्त कामे रब्बी हंगामपूर्व करण्यात आली असून जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा प्रयत्न आहे.

(४) अंशत: खरे आहे.

प्रकल्पाचे कालवे व वितरणप्रणालीची कामे पूर्ण झालेली आहेत. मात्र वितरणप्रणाली काही भागात नादुरुस्त असल्याने सिंचनास अडचण येते.

(५) जायकवाडी डाव्या कालव्यावरील मुळ बांधकामे १९७६ मध्ये झालेली असुन, यास जवळजवळ ४४ वर्षाचा कालावधी झालेला आहे. मुख्य कालवा व वितरण प्रणालीची वहनक्षमता सुस्थितीत आणण्याच्या अनुषंगाने लाभधारकांची अडचण लक्षात घेऊन व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार सर्वेक्षण व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले असुन संबंधित अभिकरणामार्फत (Agency) काम प्रगती पथावर आहे. विशेष दुरुस्तीच्या सविस्तर DPR ला प्रशासकीय मान्यता देऊन कामे हाती घेणे नियोजित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**नागपूर** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.